**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.४८/२०१७ मधील**
**निशाणी क्र.३७ वर आदेश**
**CNR-MHLA110009902018**

---

१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज वादी क्र.२ ते ८ यांनी वादी क्र.१ ला प्रतिवादी क्र.११ म्हणून समाविष्ट करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादी क्र.१ ने दावा दाखल करतेवेळी दाव्यावर अंगठा केलेला आहे. परंतु प्रतिवादींच्या सांगण्यावरुन नि.क्र.१७ ला शपथपत्र दाखल करुन दाव्यावरील अंगठा नाकारलेला आहे. त्यामुळे सदर वादी क्र.१ ला प्रतिवादी क्र.११ म्हणुन समाविष्ट करण्याची वादी क्र.२ ते ८ यांनी मागणी केलेली आहे. सदर अर्जास प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन वादी क्र.१ बाबत दाव्यामध्ये चुकीचे कथन केलेले असुन त्याअनुषंगाने खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे असे कथन केलेले आहे. तसेच त्याबाबत वादी क्र.१ वर कारवाई करुन वादी क्र.१ ला प्रतिवादी क्र.११ म्हणुन वर्ग करण्यात यावे असे कथन केलेले आहे. सदरचा दावा वादींनी मिळकतीच्या वाटपाकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर वादी क्र.१ ही पक्षकार म्हणुन दाव्यात समाविष्ट असणे आवश्यक आहे. सदर प्रकरणामध्ये नि.क्र.१७ ला वादी क्र.१ ने प्रतिज्ञापत्र दाखल करुन दाव्यावर अंगठा नसल्याचे कथन केलेले आहे.

३. सदर प्रकरणातील पक्षकारांमध्ये वादी क्र.२ ही शिवाजी राठोडची पत्नी आहे का ? याबाबत महत्त्वाचा वाद आहे. सदर दाव्याचे स्वरुप व अर्जातील कथन विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर वादी क्र.२ ते ८ यांचा दावा मिळकतींशी संबंध आहे किंवा नाही ही बाब अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळी स्पष्ट होणार आहे. सदर दाव्याचे स्वरूप व अर्जातील कथन विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, वादी क्र.१ ला प्रतिवादी क्र.११ म्हणुन वर्ग केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदरचा अर्ज नामंजूर केल्यास प्रकरणामध्ये गुंतागूंत वाढण्याची व वादी क्र.२ ते ८ यांचे अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.३७ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी क्र.२ ते ८ यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

स्वा/-

दि. ११.०७.२०१९. (शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.N. Yenge |
| Name of the Court | : Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : 11.07.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : 11.07.2019 |
| Judgment/Order uploaded on | : 12.07.2019 |